**महाराष्ट्र शासन**

आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,

जुने जकात घर, दुसरा मजला, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई- ४०० ०२३.

वाचा :- या कार्यालयाचे अ.शा.प्र.क्र. राउशु /कार्या.८/संवसां/ऑनलाईन सर्विसेस/२०१७/४५ दिनांक १८.७.२०१७

विषय:- राज्य उत्पादन शुल्क विभागातील ऑनलाईन सेवा अनिवार्य करणेसंदर्भात

क्र राउशु /कार्या.८ /संवसां / ऑनलाईन सर्विसेस /२०१७

दिनांक:- ११ ऑक्टोबर २०१७

**परिपत्रक**

उपरोक्त वाचा क्र.१ अन्वये या कार्यालयामार्फत ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्यासाठी विभागाच्या विविध मद्य परवान्यांच्या सेवा मे.महाऑनलाईन लि. यांच्यामार्फत विकसीत करण्यात येऊन सदर सेवांबाबतची आवेदने ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याबाबत कळविण्यात आले आहे. या प्रणाली अंतर्गत उपलब्ध करण्यात आलेल्या सेवांबाबतची माहिती त्यासोबत **प्रपत्र-अ** मध्ये देण्यात आली होती. या प्रणाली अंतर्गत एकूण १३ सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्याची प्रणाली व त्यासंदर्भातील पुढील कार्यवाहीची प्रणाली यशस्वी होण्यासाठी अधीक्षकांनी सातत्याने प्रयत्नशील राहण्याबाबत सूचित करण्यात आले होते. परंतु काही अनुज्ञप्तींच्या संदर्भात या प्रणालीवर कार्यवाही होतांना दिसून येत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

1) या कार्यालयामार्फत ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्यासाठी व अनुज्ञप्ती देण्यासाठी विकसीत करण्यात आलेल्या प्रणालीवर उपलब्ध असलेल्या सर्व सेवांबाबत यापुढे केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारणे अनिवार्य करण्यात येत आहे. या प्रणालीव्यतिरिक्त थेट प्राप्त होणारे अर्ज यापुढे न स्विकारता संबंधितांस ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याबाबत सूचित करण्यात यावे.

2) ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेल्या अर्जांवर कार्यवाही करतांना प्राप्त झालेल्या कागदपत्रांबाबत नियमानुसार छाननी करुन कागदपत्रांच्या त्रुटी / पूर्तता याबाबत संबंधितांस विहीत वेळेत कळविणे आवश्यक आहे.

3) ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेल्या विनंती अर्जांच्या अनुषंगाने होणा-या अनुज्ञप्तीचे प्रदान देखील सदर प्रणालीद्वारेच करण्यात येईल.

4) ऑनलाईन प्रणालीमार्फत प्राप्त झालेले अर्ज, त्यावर करण्यात आलेली कार्यवाही व प्रदान करण्यात

Scanned by CamScanner

आलेल्या अनुज्ञप्त्यांबाबतचा अहवाल प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवडयात या कार्यालयास सादर करण्यात यावा.

उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे या परिपत्रकाद्वारे अनिवार्य करण्यात येत आहे. यासंदर्भात काही अडचणी उद्भवल्यास मे. महाऑनलाईन लि. यांच्याशी अथवा संगणक शाखेशी समन्वय करुन त्या अडचणी सोडवून घेण्यात याव्यात.

(डॉ. अश्विनी जोशी)
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

१. सर्व जिल्हाधिकारी
२. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी
३. सर्व विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
४. सर्व जिल्हा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
५. या कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी,
६. आयुक्तालयातील अभिलेख शाखा ५ प्रती.

प्रत : या कार्यालयातील सह-संचालक (संगणक व सांख्यिकी) विभाग यांनी सदरचे परिपत्रक विभागाच्या वेबसाईट वर अपलोड करुन घ्यावी.

Scanned by CamScanner